प्रेसनोट

आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव
दि.26.05.2026

प्रति,

मा.संपादक
**सर्व वृत्तपत्र,दैनिक,साप्ताहीक,मासिक, जळगांव शहर**

**विषय:-** गुंतवणुकदारांची फसवणुक करणा-या TWJ असोशिएट्स प्रा.लि. या कंपनीचे मुख्य संचालकांना अटक केली बाबत..

मिलींद शालिकराव पाटील, रा. जळगाव याने TWJ असो.प्रा.लि.पुणे या कंपनीचे मुख्य संचालक व इतर संचालक यांचे विरुध्द गुंतवणुकदारांची गुंतवणुक स्विकारुन मुदतीत परतावा दिलेला नाही यामुळे तक्रार अर्ज दिलेला होता. नमुद तक्रारी अर्जाची मा. पोलीस अधीक्षक, जळगांव यांचे आदेशाने आर्थिक गुन्हे शाखा जळगांव यांनी सखोल चौकशी केली असता, चौकशीअंती TWJ असोसिएट्स प्रा.लि.चे मुख्य संचालक 1) समीर सुभाष नार्वेकर 2) सौ. नेहा समीर नार्वेकर यांचेशी झालेल्या कराराप्रमाणे मिलींद शालिकराव पाटील हाच TWJ असोशिएट्स जळगाव या फर्मचे फ्रेंचायसी नात्याने सर्व कामकाज पाहत होता. गुंतवणुकदारांकडुन गुंतवणुका स्विकारुन तसे त्यांना करारनामे करुन देत होता. तसेच त्यास मोठया प्रमाणात कमीशन प्राप्त झालेले आहे, यावरुन अर्जदार मिलींद पाटील याचा सदर गुन्हयात सहभाग निष्पन्न झाला. एकंदरीत TWJ असोसिएट्स प्रा.लि.चे मुख्य संचालक 1) समीर सुभाष नार्वेकर 2) सौ. नेहा समीर नार्वेकर तसेच TWJ इन्फ्रास्ट्रक्चर डेव्हलपमेंट प्रा.लि. चे संचालक 3) संकेश रामकृष्ण घाग, 4) TWJ असोसिएट्स जळगाव शाखेचे मिलींद शालिकराव पाटील, रा. जळगाव तसेच इतर संचालक व एजंट अशांनी डिसेंबर 2020 ते सप्टेबर 2025 या कालावधीत संगनमत करुन प्रथमत: गुंतवणुकदारांना शेअर मार्केट ट्रेडिंगची माहिती देऊन, त्यांची दिशाभूल करुन, कंपनीचे संचालकांनी ठिकठिकाणी सेमिनार आयोजीत करुन, TWJ असो. प्रा.लि. कंपनीत गुंतवणुक केल्यास जास्तीत जास्त दरमहा परतावा देण्याचे आमिष दाखवुन, नियमबाह्य स्कीम राबवुन, सेबीच्या नियमांचे उल्लंघन करुन, एकुण 279 गुंतवणुकदारांकडुन 11 महिने मुदतीकरीता एकुण 23,81,72,530/- रुपये गुंतवणुक करुन घेऊन नंतर गुंतवणुकदारांना परतावा न देता, गुंतवणुकदारांचा अन्यायाने विश्वासघात करुन, फौजदारीपात्र न्यासभंग /फसवणुक करुन अपहार केला असल्याचे निष्पन्न झाल्याने त्यांचेविरुध्द गुंतवणुकदार श्री भरत रतीलाल पवार रा. पाळधी यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन जिल्हापेठ पोलीस स्टेशन येथे गु.र. नं.165/2026 भारतीय न्याय संहिता 2023 चे कलम 318(4), 316(2), 316(5), 61(2) सह बेकायदेशीर ठेव योजना प्रतिबंध अधिनियम 2019 (THE BANNING OF UNREGULATED DEPOSIT SCHEMES ACT) चे कलम 21 व 23 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आलेला होता.

सदर गुन्हयाचे तपासात जळगांव येथील कंपनीचा ब्रँच मॅनेजर मिलींद शालीकराव पाटील यास यापुर्वी अटक करण्यात आलेली असुन तो सध्या न्यायालयीन कोठडीत आहे. गुन्हयाचे तपासात TWJ या कंपनीचे मुख्य संचालक हे श्रीनगर पोलीस स्टेशन ठाणे शहर कडील गुन्हयात मध्यवर्ती कारागृह ठाणे येथे असल्याने मा.न्यायालयाचे परवानगी कंपनीचे मुख्य संचालक 1) समीर सुभाष नार्वेकर वय-35 वर्षे 2) नेहा समीर नार्वेकर वय-36 वर्षे दोन्ही रा. गिमवी ता.गुहागर जि. रत्नागिरी यांचा ठाणे मध्यवर्ती कारागृह येथुन दि.25.05.2026 रोजी सायंकाळी ताबा घेवुन त्यांना दि.26.05.2026 रोजी रात्री 00.51 वा. अटक करण्यात आलेली आहे. सदर दोन्ही आरोपी यांना आज मा.सत्र न्यायालयात हजर केले असता, मा.न्यायालयाने दोन्ही आरोपी यांची दि.29.06.2026 पावेतो पोलीस रिमांड दिलेली आहे. पोलीस

Scanned with OKEN Scanner

कस्टडी दरम्यान सदर आरोपीकडे TWJ कंपनी बाबत सविस्तर तपास करुन गुन्ह्यातील मालमत्ते संदर्भात सखोल तपास करीत आहोत.

सदर TWJ असो.प्रा.लि. पुणे या कंपनीचे संचालक असलेल्या अटक आरोपींवर

1)अवधुतवाडी पोस्टे (यवतमाळ) गुरन 1306/2025 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 318 व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

2) चिपळुण पोस्टे (रत्नागिरी) गुरन 216/2025 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 316(2),318(4) व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

3)खारघर पोस्टे (नवी मुंबई) गुरन 406/2025 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 318(4) व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

4) वारजे माळेवाडी (पुणे शहर) गुरन 401/2025 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 316(2),318(4) व इतर अनियंत्रीत ठेव योजना प्रतिबंध अधिनिअम 2019 चे कलम 21 व 23

5)श्रीनगर पोस्टे (ठाणे शहर) गुरन 810/2025 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 316 (2),318(4) व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

6) धंतोली पोस्टे (नागपुर शहर) गुरन 508/2025 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 316(2),318(4) व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

7) माणगांव (रायगड) गुरन 29/2026 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 316(2),318(4) व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

8)एम आय डी सी सिडको पोस्टे (छत्रपती संभाजी नगर, शहर) गुरन 98/2026 भारतीय न्याय संहीता 2023 चे कलम 316(2),318(4) व इतर सह MPID कलम 3 व 4 प्रमाणे

असे गुन्हे दाखल असुन श्रीनगर पोलीस ठाणे, ठाणे शहर यांनी त्यांचे गुन्हयात आरोपी समीर सुभाष नार्वेकर व नेहा समीर नार्वेकर यांना दि. 29.01.2026 रोजी अटक करण्यात आलेली असुन न्यायालयीन कोठडीत असल्याने सदर आरोपी यांचा ताबा घेण्यात आला आहे.

सदर गुन्हयाचा तपास मा. पोलीस अधीक्षक श्री. श्रीकांत धिवरे, मा.अपर पोलीस अधीक्षक, संदीप गावित, प्र.पोलीस उप अधिक्षक संदीप पाटील (पो.नि.) आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि गणेश फड व पोकॉ. विकास पहुरकर, पोहेकॉ.घनश्याम पवार, मपोहेकॉ.स्मिता पाटील, पोहेकॉ.विलास तायडे, पोहेकॉ.रतिलाल पवार, पोहेकॉ.भरत जेटवे, पोहेकॉ.निलेश सुर्यवंशी, पोहेकॉ.मुददसर काझी, पोकॉ. नवल हटकर व पथक करीत आहे. तरी TWJ असो.प्रा.लि. जळगांव शाखा येथे गुंतवणुक केलेल्या गुंतवणुकदारांनी आपण गुंतवणुक केलेल्या गुंतवणुकीची माहीती आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव येथे द्यावी असे आवाहन करण्यात येत आहे.

प्र.पोलीस उप अधिक्षक,
आर्थिक गुन्हे शाखा, जळगांव


पोलीस
आर्थिक गुन्हे
जुने पोलीस